दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१७ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 17 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 59 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### कांदा उत्पादकांना किमान १५०० रुपयांचे अनुदान द्या

**मुंबई**–राज्य कांदा उत्पादक संघटनेने शासनाकडे कांदा उत्पादकांना किमान १५०० रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे. भारताचे शेजारील देश, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश तसेच नेपाळसारख्या देशांमधील राजकीय धोरणे तसेच अस्थिरता असल्याने कांदा निर्यातीवर परिणाम होत आहे. त्यात आंतरराष्ट्रीय बाजारात कांदा विक्रीत चीन स्पर्धा करत आहे. या स्थितीत शासनाने कुठल्याही स्थितीत नाफेड व एनसीसीएफ कडील बफर स्टॉकमधील कांदा विक्री बंद करावी, धोरणांमध्ये सुधारणा करावी आणि कांदा उत्पादकांना किमान १५०० रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी राज्य कांदा उत्पादक संघटनेकडून करण्यात आली आहे.

# सन्नाटा कोणाकडे होता? आमच्याकडे की त्यांच्याकडे?:एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंना टोला

## पराभव दिसू लागल्याने त्यांचे अवसान गळाले

### ठाकरेंच्या काळातील हुकूमशाही पाहिले

**लोकशाहीच्या नावाखाली चालू असलेली हुकूमशाही आम्ही खपवून घेणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. यावरही एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या काळात हुकूमशाही पाहिलीय. नेहमीच्या अधिकाऱ्याला मारणे, कंगना राणावतचे घर तोडणे, नारायण राणेंना जेवताना अटक करणे, पत्रकारांना अटक करणे ही हुकुमशाही त्यांनी दाखवलीय, असे एकनाथ शिंदे म्हणाले.**

### विरोधकांना आत्मपरीक्षणाचा सल्ला

**लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर याला जेलमध्ये टाकणार, त्याला जेलमध्ये टाकणार, बर्फाच्या लादीवर झोपवून मारणार ही कुणाची वक्तव्ये होती. ही कुठली लोकशाही आहे. त्यामुळे जे काही बोलतो, ते विचारपूर्वक बोलला पाहिजे. समोरच्या बोट दाखवताना तीन बोटे आपल्याकडे असतात, याचा विचार केला पाहिजे. विरोधकांनी आत्मपरीक्षण आणि आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे, असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी दिला.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केलेल्या मागण्यांवर आणि त्यांच्या एकत्रित भूमिकेवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र टीका केली आहे. विरोधकांनी आपला पराभव मान्य केल्याचे आणि त्यांचे अवसान गळाल्याचे दिसत असल्यामुळेच ते एकत्र आले, असे शिंदे म्हणाले. तसेच सन्नाटा कोणाकडे होता? आमच्याकडे की त्यांच्याकडे? असे म्हणत राज ठाकरेंना टोला लगावला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज सलग दुसऱ्या दिवशी राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी मतदार याद्यांतील चुकांवर बोट ठेवत आयोगावर धारदार प्रश्नांची सरबत्ती केली. त्यानंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेतून निवडणूक आयोगासोबत झालेल्या बैठकीत आपले कोणतेही समाधान झाले नसल्याचे मत व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.सगळे पक्ष एकत्र आल्यामुळे आपण जिंकू, असा विश्वास त्यांना वाटायला हवा होता. मात्र, त्यांना जिंकण्याची खात्री वाटत नाही, उलट महायुती १०० टक्के जिंकणार असा विश्वास त्यांना निर्माण झाला आहे. म्हणूनच त्यांनी निवडणूक आयोगाकडे निवडणुका रद्द करण्याची आणि मतपत्रिकेवर घेण्याची मागणी केली आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या, तेव्हा निवडणूक आयोग त्यांना चांगला वाटला. तेव्हा त्यांनी आयोगावर कोणतेही आक्षेप घेतले नाहीत. जेव्हा त्यांना निवडणुकीत यश मिळते, ते जिंकतात, तेव्हा मात्र सगळेच चांगले असते. पण जेव्हा हरतात तेव्हा निवडणूक आयोगाला दोष देण्याचे काम ते करत असतात, असा टोला शिंदे यांनी विरोधकांना लगावला. बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या मागणीबद्दल बोलताना त्यांनी 'ईव्हीएम मशीन प्रक्रिया काँग्रेसच्या काळात सुरू झाली,' याची आठवण करून दिली.विधानसभा निवडणुकीत २३२ जागा जिंकल्यानंतरही महाराष्ट्रात सन्नाटा होता. तसेच मतदार याद्या न दाखवणे हाच पहिला घोळ असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. यावरही एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. सन्नाटा कुणाकडे होता? आमच्याकडे की त्यांच्याकडे? असा टोला शिंदे यांनी राज ठाकरेंना लगावला.

### नंदुरबार पोलीस सायबर सेलचे मोठे यश!

# १.४३ कोटींच्या सायबर फसवणुकीपैकी ३४ लाख रुपये तक्रारदारांना परत; 'जनजागृती अभियान' सुरू

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र राज्य सायबर सेलच्या निर्देशानुसार गृह मंत्रालय आणि आय ४ सी यांच्या मार्गदर्शनाखाली, नंदुरबार जिल्हा पोलीस सायबर सेलने नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी 'जनजागृती उपक्रम-ऑक्टोबर २०२५' या विशेष अभियानाची सुरुवात केली आहे.

या अभियानाचे उद्घाटन दिनांक: १६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता संवाद हॉल, नंदुरबार येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस यांनी या उपक्रमाची माहिती दिली.पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, नंदुरबार जिल्हा सायबर सेलने या वर्षात सायबर फसवणूक संदर्भातील गुन्ह्यांमध्ये मोठी कामगिरी केली आहे. एकूण १ कोटी ४३ लाख ९९ हजार ६५६ रुपये इतक्या फसवणूक झालेल्या रकमेपैकी तब्बल ३४ लाख ३७ हजार ८२५ रुपये इतकी रक्कम यशस्वीरित्या तक्रारदारांना परत मिळवून देण्यात आली आहे.या जनजागृती अभियानांतर्गत, ऑक्टोबर २०२५ या संपूर्ण महिन्यात शाळा, महाविद्यालये, खाजगी संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. यामध्ये नागरिकांना ओटीपी फसवणूक, बँकिंग फसवणूक, बनावट वेबसाईट्स, फिशिंग लिंक्स, व्हॉट्सअॅप फसवणूक, डिजिटल अरेस्ट, 'डीप फेक' व्हिडीओ फ्रॉड आणि ऑनलाईन शॉपिंग फसवणूक यांसारख्या विविध सायबर गुन्ह्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.



**जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस. यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही प्रकारची संशयास्पद ऑनलाईन व्यवहार किंवा फसवणूक झाल्यास विलंब न लावता तात्काळ सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० आणि १९४५ वर संपर्क साधावा, तसेच www.Cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आपली तक्रार नोंदवावी.**

### सौ.जानवी ससाणे यांच्या पुढाकाराने

# ऊसतोड कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

सौ. जानवी गोविंद ससाणे (सरपंच, सोनीजवळा) यांच्या पुढाकाराने आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड व सोनीजवळा ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ऊसतोड कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात तब्बल ३८० ऊसतोड कामगारांना आरोग्य कार्ड वितरित करण्यात आले. या कार्डच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना ज्या ठिकाणी ते ऊसतोडीसाठी असतील, त्या ठिकाणच्या सरकारी दवाखान्यात पुढील तपासणी व उपचारांचा लाभ मिळणार आहे.शिबिरात ज्येष्ठ नागरिक, गरोदर माता, तसेच लहान-मोठ्या मुलांची सर्व तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली. यामध्ये वजन, उंची, हिमोग्लोबिन तपासणी, ऍनिमियाचे निदान, रक्तातील साखर, बीएमआय, तसेच सर्वसामान्य आजारांसाठी तपासणी करण्यात आली. अंगदुखी,



खोखला, जुलाब, सर्दी, टीबी अशा आजारांवरील गोळ्या, सिरप व औषधोपचार सर्वांना मोफत पुरविण्यात आले.या शिबिरात डॉ. केशव सारुक (वैद्यकीय अधिकारी, यु. वडगाव), डॉ. कृष्णा सूर्यवंशी, प्रीतम बचूटे (लॅब टेक्निशियन), अंगद घोडके, विशाल सूर्यवंशी, संभू वैरागे, सौ. सुनीता पंडित, सौ. अर्चना ससाणे यांनी सक्रिय सहकार्य केले.सौ. जानवी ससाणे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांना आरोग्यसेवेचा मोठा लाभ मिळून त्यांच्या आरोग्य जनजागृतीत मोलाची भर पडली.

## सादोळा व आनेगाव गाव भेटी दरम्यान मा.रमेशराव आडसकर यांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सादोळा आणि आनेगाव परिसरातील शेतकरी व मच्छीमार नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी रमेशराव आडसकर यांनी दि.१५ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्रामभेट घेतली.या दौऱ्यात त्यांनी मांजरा धरणात मच्छीमारी व्यवसाय करणाऱ्या नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या अडचणींविषयी सविस्तर चर्चा केली.

मच्छीमार नागरिकांनी सध्या सुरू असलेल्या परवानगी,पाणीस्तर आणि व्यवस्थापनाशी संबंधित अडचणींबद्दल मांडणी केली.या समस्या गांभीर्याने ऐकून श्री.रमेश आडसकर यांनी तत्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधला आणि या समस्या दोन दिवसांच्या आत मार्गी लावाव्यात, अशा स्पष्ट सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनीही त्वरित कारवाई करून समस्या निराकरणाचे आश्वासन दिले.यानंतर त्यांनी आनेगाव येथे शेतकरी व ग्रामस्थांशी संवादसाधला. शेती,पाणीपुरवठा आणि रस्ते दुरुस्ती आदी स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून नागरिकांना सकारात्मक आश्वासने दिली.ग्रामविकासासाठी नेहमीच आपल्या पाठीशी उभे राहू,असेही श्री.रमेश आडसकर यांनी स्पष्ट केले.या गावभेटी प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुकाध्यक्ष श्री.अमर भैय्या पाटील,राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष शिवदास थळकरी,माजी सरपंच बाळासाहेब नांदे,माजी चेअरमन शंकरराव इंगळे, आप्पासाहेब मोरे,शोकत शेख,श्रीराम इंगळे यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामभेटी मुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक प्रश्न तातडीने सुटण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## 'गव्हाई'ची पद्धत ठरली वरदान!

# चांगल्या पावसामुळे बोरक परिसरात 'कसदार दादरी'च्या पेरणीला सुरुवात; नैसर्गिक ज्वारीला मोठी मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । मंगेश पाटील**

यावर्षी झालेल्या दमदार पावसामुळे जमिनीत ओलावा मोठ्या प्रमाणात टिकून राहिला आहे. याच ओलाव्याचा फायदा घेण्यासाठी बोरद परिसरात रब्बी हंगामातील 'दादरी' (ज्वारी/बाजरी) पिकाच्या पेरणीसाठी शेतीच्या मशागतीच्या कामांनी वेग घेतला आहे. विशेष म्हणजे, रब्बीत उत्तम पीक घेण्यासाठी येथील शेतकरी जाणूनबुजून खरीप हंगाम रिकामा ठेवतात, ज्याला अहिराणी भाषेत 'गव्हाई' असे म्हणतात.

बोरद परिसरात ज्या शेतकऱ्यांचे शेत बागायत (सिंचनाखाली) नाही, ते शेतकरी दीर्घकाळापासून ही पारंपरिक 'गव्हाई' पद्धत वापरत आहेत. खरीप हंगामात शेत रिकामे ठेवल्यामुळे जमिनीला आवश्यक विश्रांती मिळते आणि जमिनीत ओलावा दीर्घकाळ टिकून राहतो. याच ओलाव्यावर आधारित रब्बी हंगामातील ज्वारी (दादर) पीक घेतले जाते.पावसाळा संपल्यानंतर थंडीची चाहूल लागण्यापूर्वी दादरीची पेरणी केली जाते. यासाठी शेतकरी आपल्या शेतात उगवलेले तण आणि अनावश्यक वनस्पतींची 'वेचणी' करून शेत पूर्णपणे स्वच्छ करत आहेत. आवश्यक मशागत पूर्ण झाल्यानंतर स्वच्छ शेतात बाजरीची पेरणी केली जाईल. दादरीची पेरणी झाल्यानंतर थंडीलाही सुरुवात होते, ज्यामुळे जमिनीत असलेला ओलावा दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते आणि उत्पादनात वाढ होते.

बोरद परिसरातील ही यशस्वी पद्धत इतर शेतकऱ्यांसाठी एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पारंपरिक पद्धतीचा अवलंब करत, नैसर्गिक ओलावा आणि हवामानाचा योग्य फायदा घेऊन शेतकरी चांगल्या गुणवत्तेचे उत्पादन मिळवू शकतात आणि बाजारात आपल्या पिकाला मोठी मागणी निर्माण करू शकतात. योग्य वेळेत मशागत करून पेरणी केल्यास यावर्षी दादरीचे उत्पादन उत्तम होण्याची शक्यता आहे.



### रासायनिक खतांचा वापर नाही, म्हणून मागणी अधिक

**बोरद परिसरातील 'दादरी'ला बाजारात मोठी मागणी असते. याचे मुख्य कारण म्हणजे येथील शेतकरी या पिकासाठी कुठल्याही प्रकारचे रासायनिक खत वापरत नाहीत. ही ज्वारी पूर्णपणे नैसर्गिक हवामानावर अवलंबून पिकवली जाते. त्यामुळे ती कसदार आणि गुणवत्तापूर्ण असते. या नैसर्गिक पद्धतीमुळेच शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला चांगला भाव मिळतो.**

संपादकीय

# व्यक्तिमत्त्व विकास



व्यक्तिमत्त्व विकासाच्या टप्प्यात साहित्याच्या योगदानाचा विषय महत्त्वाचा ठरतो. भाषा चळवळीद्वारे वैचारिक प्रगल्भतेतून समृद्धी स्रोताचा उगम होत असता, दुसरीकडे व्यक्तिमत्त्व विकासाच्या पायघड्या वाट पाहत असतात, ज्याच्या प्रभावाने आपल्या जीवनाचा ऊष:काल चिरायू होतो. जगभरात कुठल्याही भाषेचा प्रचार, प्रसार आणि संचार होण्याची मूळ कारण म्हणजे विकसित आणि वैकल्पिक तंत्रज्ञान होय. साहित्य क्षेत्रात आपल्या मराठी भाषेला सर्वोत्तम दर्जा प्राप्त झाला आहे. नामांकनाने तिच्या अस्तित्वाची जगमान्य मोहोर उठली आहे, ज्यात भाषेवरील शोध प्रबंध, त्याला लाभलेले रत्नजडित अलंकार, प्रतिमा, प्रतीक आणि विशेषणांचे बहुमोल संस्कार आहेत. यास्तव त्यावरील जतन, संवर्धनातून अति महत्त्वाच्या गोष्टी आपल्या प्रतीक्षेत आहेत. साहित्याची धुरा सांभाळणारा समाजातील मोठा घटक अर्थात पंडित, साहित्यिक, वैचारिक बैठकीतले दिग्गज जे भाषेला तिच्या साहित्याला पुढे नेण्याचं काम करतील. त्यातून कविता, कथा, कादंबऱ्या, ललित, व्यक्तीचारित्र्य विशेष संपादित साहित्य, पत्रलेखन, ऐतिहासिक, सामाजिक आणि न्यायविषयक साहित्याची या न त्या कारणाने झालेली ओळख साथ करेल. साहित्य हे जीवनाचे दर्शन घडवणारे असल्याने ते माणसाच्या रंजनाचे, उद्बोधनाचे, मार्गदर्शनाचे प्रमुख साधन आहे. व्यक्तिमत्त्व विकासाच्या जडणघडणीत भाषेतल्या विविध साहित्याचा फार मोठा वाटा आहे. साहित्य हे कलेसाठी कला नसून जीवनासाठी मानणारे वि. स. खांडेकर म्हणतात की, पाणबुड्यांना उत्कृष्ट मोत्यांसाठी समुद्राचा तळ गाठावा लागतो, पण चांगल्या वाङ्.मयातले मोती नेहमी पृष्ठभागावर तरंगत असतात. साहित्य विषयावर होणारी जाणकारांची व्याख्याने, संवाद, भाषणे आपलं मनोधैर्य वाढवतात. विचारधारेचं समर्थन करण्याची ताकद विशिष्ट साहित्यात असल्याने कुठल्याही व्यक्तिमत्त्वावर ती छाप पाडतात जी उत्तम दिशादर्शकाचे काम करतात. साहित्याची उंची छोटी अथवा मोठी नसते. ती प्रत्यक्ष जीवनरूपी आरशाचं काम करते. जीवनात साक्षात्कार घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम करताना मानवी हृदयावर सौंदर्याचे संस्कार कोरीत साहित्यातून कला जोपासली जाते. यालाच कलेतल्या साहित्याचा उगम असे म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीवर आसपास घडणाऱ्या गोष्टींचा प्रभाव असतो. तो दिसतोही. म्हणजे बघा स्वत:चे वा समोरील व्यक्तीचे अंतर्मन जाणण्यासाठी त्याचं कौशल्यपूर्ण बोलणं अतिशय तारक ठरतं, जे गोष्टी विकसित करण्यासाठी प्रत्यक्ष जीवनात साहित्यिक योगदान फळाला येतं. मानव जन्माला येताना शारीरिक वाढीसह मानसिक उन्नयन त्यायोगे व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाची वाढ होते. व्यक्तीच्या जीवनातील पहिले ग्रंथालय म्हणजे त्याचे घर आणि जीवनातील पहिले वहिले साहित्यिक म्हणजे त्याचे आई आणि वडील होत. इथून पुढे प्रत्यक्ष जीवन प्रवासात साहित्यविषयक योगदानाचा प्रभावपडायला लागतो. घरात असलेली ज्येष्ठ मंडळी, आई, वडील आणि आनंद निर्मितीसाठी पूरक-पोषक असलेले वातावरण, याचा विचार हा पुढील बाजू भक्कम करतो. चारभिंती, खिडक्या, दारासह कुटुंबातील सदस्यांना पुढे नेणाऱ्या परंपरा, त्याला सुसंस्कृत आणि सुसंगत ठरणारे आचार, विचार, संस्कार या सगळ्या गोष्टींनी सुरू होतो प्रापंचिक साहित्य प्रवास. पुढे शालेय जीवनात विद्यार्थी रूपात गुरुशिष्याच्या नात्यामध्ये जडलेला व्यासंग. ज्ञानार्जनासाठीचे अध्ययन. पुस्तकांशी मैत्री होण्याच्या काळात मनावर कोरलेले संस्कार कायम रुजतात, जे मानवी मनात आनंद वृत्ती निर्माण करणारे ज्ञान, साहित्य, विद्या, विचार आत्मसात करताना दिसतात. मनन, वाचनाने संकलीत ज्ञान प्राप्त करण्याची सगळी दालनं खुली होतात. दरवेळी 'अभ्यासोनी प्रगटावे' चा जीवन मंत्र लक्षात घेता, आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार ठरू हे निश्चित होय. थोडसं धाडस दाखवून, कष्टाने, मेहनतीने मशागत होऊ लागली की कस्तुरीचा दरवळ आपसूक येऊ लागतो. व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली पायरी अवघड नसली तरी विचारांचे कुंपण मजबूत असावे लागेल.मोठ्या विचारवंतांची नाळ साहित्याशी जोडली असल्याने एका महान व्यक्तिमत्त्वाची उपाधी त्यांना सहज मिळते. त्यामागचा व्यासंग, प्रयत्नाची पराकाष्ठा पराकोटीची असते हे विसरून चालता कामा नये. हरेक वाचनाची फलश्रुती म्हणजे व्यक्तिमत्त्व विकासाची पायाभरणी होय. मनन, वाचन, संकलन यातून अभिव्यक्त होत जगणं आणि कृतिशील बनणं या व्यक्तिमत्त्व विकासाच्या उन्नत पायऱ्या आहेत. महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे जीवनात साहित्य अभ्यासामुळे आपल्यात स्वागतार्ह बदल घडतो. ज्यातून विकास घडतो. आगंतुकासारखी झालेली प्रगती आपल्या टप्प्याची दिशा ठरवते. आपलं मन आपणास एक पावती देते त्यावेळी अनंत परिश्रमात दडलेली प्रतिमा ही प्रतिभेच्या रूपात अवतरते. तेव्हा सत्य, शिव, सौंदर्य याचं संमेलन म्हणजे अवघे साहित्यविश्व संमेलन मानून व्यक्तिमत्त्व विकासाची कला सगळ्यांना अवगत होओ या शुभेच्छा. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आपलं लेखन पुस्तक संचात, दिवाळी अंकात लेखन रूपाने बहरत राहो.

# शेतकरी,सभासदांच्या हिताचे काय?




नाशिक बाजार समितीत सध्या सत्ताधारी, विरोधकांमध्ये काही महिन्यांपासून आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या सुरू आहेत. नाशिक बाजार समितीत वादग्रस्त बांधकाम आणि २१ गाळेधारक या दोन प्रकरणी उच्च न्यायालयाने समितीला दणका दिला आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक स्वहित साधण्यात व्यस्त आहे, त्यामुळे आमच्याकडे बघणार की नाही, असा सवाल आता शेतकरी सभासद उपस्थित करत आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने न्यायमूर्ती रेवती मोहिटे डेरे आणि न्यायमूर्ती संदेश डी. पाटील यांच्या खंडपीठाने अरुण जयराम काळे यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक २५०७/२०२५ वर सुनावणी घेतली. खंडपीठाने बाजार समितीला अजून एक आठवड्याची मुदत दिली असली तरी, त्यासाठी १५ हजार दंड स्वरूपात याचिकाकर्त्यांना देण्याचे निर्देश दिले. नाशिक बाजार समितीने ३१ ऑगस्ट २०२४ रोजी शरदचंद्र पवार मार्केट यार्ड परिसरात कमर्शियल कॉम्प्लेक्स क्र.४ बांधकामासाठी निविदा मागवली होती. या कामाची किंमत ५.७७ कोटी (करांसह ७.८७ कोटी) इतकी होती. सर्व तांत्रिक तपासणीनंतर, ४ सप्टेंबर २०२४ रोजी बांधकाम उपसमितीने त्यांच्या निविदेला मंजुरी दिली आणि ६ सप्टेंबर २०२४ रोजी वर्क ऑर्डर क्र. ५९७/२०२४-२५ जारी करण्यात आली.कंत्राटदाराचा दावा आहे की, त्यांनी काम वेळेत व दर्जेदारपणे पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले, तसेच एपीएमसीचे अधिकारी व संचालकांनी कामाबद्दल समाधान व्यक्त केले होते. मात्र, बोर्डामध्ये अंतर्गत मतभेद निर्माण होऊन अविश्वास ठराव, नवे चेअरमन आणि व्हॉइस-चेअरमन यांच्या निवडीनंतर वाद सुरू झाला. लाच, धमक्या आणि काम बंदचे आरोप करण्यात आले आहेत. कंत्राटदाराला ९० हजारांची रक्कम रोखण्यात आली तसेच 'निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचे' आरोप करण्यात आले. या आरोपांना उत्तर म्हणून त्यांनी ३ मे २०२५ रोजी स्पष्टीकरण पाठवले आणि ४ जून २०२५ रोजी दुसरे पत्र दिले. कंत्राटदाराचा आरोप आहे की, कामात अडथळे आणल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले, यंत्रसामग्रीचे नुकसान व चोरीच्या घटना घडल्या. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी देऊन १ लाख नुकसानभरपाईची मागणी केली आहे. देविदास पिंगळे पायउतार होऊन सभापतीपदी कल्पना चुंबळे आल्यानंतर बाजार समितीत चांगलेच राजकारण सुरू आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या दिवसेंदिवस अधिक वाढत आहेत. जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सहकारमंत्री, उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय असा याबाबतच्या वादाचा प्रवास झाल्यामुळे बाजार समिती चांगलीच चर्चेत राहिली आहे. सध्या उच्च न्यायालयाचा प्रवास जोरात आहे. आत सत्ताधाऱ्यांनीदेखील विरोधकांना विश्वासात घ्यावे, तर विरोधकांनीदेखील शेतकऱ्यांच्या हितासाठी सत्ताधाऱ्यांना साथ दिल्यास खऱ्या अर्थाने बळीराजा अन् समितीचा विकास जलदगतीने होण्यास वेळ लागणार नाही, एवढे मात्र नक्की. सर्वसाधारण सभेतही आरोप नाशिक बाजार समितीचे माजी सभापती देविदास पिंगळे यांच्या कार्यकाळात सभेची मान्यता न घेताच लाखोची कामे करण्यात आली आहेत. त्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. तसेच झालेल्या बांधकामांची चौकशी करण्यात यावी, यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला पत्रही देण्यात आल्याची माहिती बाजार समितीच्या सभापती कल्पना चुंभळे यांनी नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत दिली. त्यानंतर माजी सभापती पिंगळे यांनीही सभापती चुंबळे आल्यापासून समितीचे वार्षिक उत्पन्न कमी झाले असून भ्रष्टाचाराचे केंद्र बिंदू झाले असल्याचे सांगितले. लाचलुचपत खात्याकडून समितीच्या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याची आठवणही पिंगळे यांनी चुंबले यांना करून दिली आहे. त्यामुळे पुढील काळात हा वाद आणखी भडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.सत्तांतरानंतर रंगले राजकारण बाजार समिती गेल्या वर्षी सत्तांतर झाले. देविदास पिंगळे यांच्याऐवजी सभापतीपदी कल्पना चुंबळे यांची निवड झाली आहे. सदर प्रकरण हे पिंगळे यांच्या सभापती पदाच्या कारकिर्दीत झालेले आहे. त्यामुळेच अरुण काळे यांच्या प्रकरणाबाबत न्यायालयात बाजू मांडली जात नसल्याची चर्चा सभासदांमध्ये जोर धरू लागली आहे. शेतमालाची सुलभ विक्री, त्याला चांगला भाव मिळावा, यासाठी बाजार समितीची स्थापना करण्यात आली आहे; परंतु राजकारण आणि भ्रष्टाचार यांमुळे गेल्या काही वर्षांपासून बाजार समित्या चांगल्याच चर्चेत राहिल्या आहेत. शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा यासाठी त्यांना मतदानाचा अधिकार मिळावा, अशी मागणी जोर धरू लागली होती; परंतु निवडणूक खर्च वाढेल या कारणाने शासनाने ही मागणी मागे ठेवली. मात्र शेतकऱ्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील काळात शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार कसा मिळेल याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची वेळ आली आहे. बाजार समितीत शेतकऱ्यांचा टक्का कसा वाढेल हा शासनाचा हेतू यापुढील काळात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.२१ गाळेधारकांना मिळाला न्याय्य नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शरदचंद्र पवार मार्केट यार्डातील भाडेतत्त्वावर दिलेली २१ गाळे खाली करण्याची नोटीस दिली होती. त्यामुळे गाळेधारकांनी पणन मंत्रालयाकडे दाद मागितली. ५ पैकी दीड वर्षे बांधकामात गेले असल्याने गाळेधारकांना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी मुदत वाढ देत बाजार समितीच्या नोटिसीला स्थगिती दिली आहे. या निकालामुळे नाशिक बाजार समितीला चपराक बसली आहे.

# अस्थिरता अन् अशांतता



देशाच्या निर्मितीपासून पाकिस्तानकडे पाहिलं, तर एकच गोष्ट स्थिर आहे, ती म्हणजे अस्थिरता अन् अशांतता! पाकिस्तानच्या राजकारणावर नजर टाकल्यास या देशाच्या पाचवीला पुजलेली राजकीय अस्थिरता आजही कायम आहे. १९४७ मध्ये पाकिस्तानची निर्मिती झाली; परंतु आजतागायत एकाही सरकारला त्याचा कार्यकाळ पूर्ण करता आलेला नाही. आजही पाकिस्तान मोठ्या अस्थिर परिस्थितीला तोंड देतोय. स्वातंत्र्यानंतर गेल्या ७५ वर्षांत पाकिस्तानात केवळ ३७ वर्षेच लोकांनी निवडलेलं सरकार सत्तेत राहिलं. ३२ वर्षे लष्करशहांनी सत्ता हाती ठेवली. उरलेली आठ वर्षं या देशाने राष्ट्रपती राजवट अनुभवली. पाकिस्तानने तब्बल २२ पंतप्रधान पाहिले. पण यातील एकाही पंतप्रधानाला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. सर्वाधिक तीन वेळा पंतप्रधान झालेले नवाज शरीफ हे पाकिस्तानातील सर्वाधिक म्हणजे ९ वर्षं सत्तेत राहिलेले राजकीय नेते मानले जातात. सध्या त्यांचे बंधू शाहबाज शरीफ हे पंतप्रधान आहेत. संसदेत सरकार असलं, तरी सारी सत्ता लष्कराचीच आहे.विद्यमान लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे भारताच्या सीमेवर तणाव वाढला. आता अफगाणिस्तानच्या सीमेवरील युद्धालाही मुनीर यांची महत्त्वाकांक्षा जबाबदार असल्याचं मानलं जात आहे. राजकीय अशांतता, दहशतवादी हल्ले, आर्थिक संकटामुळे पाकिस्तान आतून पुरता पोखरला आहे. ही गोष्ट जगापासून लपून राहिलेली नाही. अशा अनिश्चित वातावरणात पाकिस्तानची वाटचाल पुन्हा एकदा लष्करी राजवटीकडे सुरू झाली आहे. नवाज शरीफ यांच्याव्यतिरिक्त, लियाकत अली खान आणि युसूफ रझा गिलानी यांनी सलग चार वर्षांपेक्षा जास्त काळ पंतप्रधानरषपद भूषवलं. पंतप्रधान सत्तेवर असतानाही त्यांच्यावर कायम लष्कराची नजर असेच. त्यामुळे त्यांना कधीही मोकळेपणाने राज्यकारभार करता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कट्टर दुश्मनीही जगाला ठाऊक आहे; परंतु पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन मुस्लीम राष्ट्रात सध्या सुरू असलेलं युद्ध संपूर्ण जगात चर्चेचा विषय झाला आहे. जोरदार गोळीबार आणि चकमकींमुळे दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहोचला आहे. या दोन देशांच्या सीमेवर गेले दोन दिवस सुरू असलेल्या संघर्षामुळे दोन्ही बाजूंचं मोठं नुकसान झालं आहे. तालिबानने ५८ पाकिस्तानी सैनिकांना मारल्याचा दावा केला आहे, तर पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या अनेक चौक्या ताब्यात घेतल्याचं म्हटलंय. १९९०च्या दशकात तालिबान हा धर्मवेड्या विद्यार्थ्यांचा एक लहान गट होता. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान पुन्हा ताब्यात घेतला आणि तेव्हापासून त्यांनी राष्ट्रीय सैन्य तयार करण्याचा प्रयत्न केला. पूर्वी, त्यांची ताकद फक्त लढाऊ होती. आता ते एक संघटित शक्ती म्हणून काम करू लागले आहेत. त्यातूनच त्यांनी पाकिस्तानला धडा शिकवला आहे. त्यात अमेरिकेचे विशेष प्रतिनिधी आणि दक्षिण आशियाचे अभ्यासक झल्मे खलीलझाद यांनी पाकिस्तानच्या धोरणांबाबत दिलेल्या प्रतिक्रियेमुळे पाकिस्तान किती अडचणीत आहे, हे दिसून येतंय. खलीलझाद हे २०१८ ते २०२१ दरम्यान अफगाणिस्तानसाठी अमेरिकेचे विशेष प्रतिनिधी होते. तालिबान परत सत्तेत आल्यानंतर ते अमेरिकेत परतले. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रियेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. खलीलझाद यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तान स्वतःची कबर खोदत आहे. तालिबानशी संघर्ष किंवा शेजारील देशांशी बिघडलेले संबंध इस्लामाबादसाठी महागडे ठरू शकतात. पाकिस्तानने सध्या ज्या धोरणांचा अवलंब केला आहे, त्याचा भविष्यात गंभीर परिणाम होईल.याच पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील वाढत्या सीमा संघर्षात मध्यस्थी करण्याची ऑफर दिली आहे. आंतरराष्ट्रीय बाबींमध्ये मध्यस्थी करण्याची ऑफर देऊन, ट्रम्प यांनी पुन्हा एकदा जागतिक व्यासपीठावर सक्रिय भूमिका बजावण्याचा टेंभा मिरवला असला, तरी त्याचा परिणाम उलट पाकिस्तानात झालेला दिसतो. ट्रम्प यांच्या गाझा शांतता योजनेला पाठिंबा दिल्याने पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. कट्टरपंथी इस्लामी पक्ष तहरीक-ए-लब्बैक पाकिस्तान (टीएलपी)ने देशभर निदर्शनं केली. एवढंच नव्हे, त्यांनी अमेरिकन दूतावासाकडे कूच करण्याचा प्रयत्न केला; यावेळी पोलिसांशी चकमक झाली. त्यात दोन निदर्शकांचा मृत्यू झाला. इस्लामाबादमध्ये टीएलपीने मोर्चा काढला. मोर्चा रोखण्यासाठी सरकारने राजधानीकडे जाणारे प्रमुख रस्ते बंद केले. इस्लामाबाद आणि रावळपिंडीमध्ये मोबाइल, इंटरनेट सेवा बंद करण्याची वेळ पाकिस्तान सरकारवर आली. पंजाब पोलिसांनी टीएलपी मुख्यालयावर छापा टाकला आणि त्यांचे नेते साद रिझवी यांना अटक करून संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या संघर्षात सुमारे डझनभर पोलीस अधिकाऱ्यांसह अनेक लोक जखमी झाले. दंगल रोखण्यासाठी प्रमुख रस्त्यांवर पोलीस तैनात करण्यात आले. सरकारी कार्यालये आणि परदेशी दूतावास असलेले रेड झोन पूर्णपणे सील करण्यात आले. पंजाबमध्ये १० दिवसांसाठी कलम १४४ लागू करण्यात आले आहे. अमेरिकेच्या तालावर चालणाऱ्या पाकच्या धोरणामुळे पाकिस्तानातील शहरांमध्ये अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली आहे. असं चित्र देशभर निर्माण झालं आहे.

# आजूबाजूच्या या १० वस्तू असतात जंतूंनी भरलेल्या,ज्यांना रोज स्पर्श होतो



दिवसभर आपण बरीच काम करत असतो, प्रवास करत असतो. धुळ, प्रदूषण यामुळे नक्कीच आपण अनेक जंतूंच्या संपर्कात येतो. मग ते घरातील वस्तू असू दे किंवा मग बाहेरच्या वस्तू. आणि कधीकधी त्याचे आपल्याला भान राहत नाही त्याच हातांनी मग आपण काहीही अन्न खातो. त्यामुळे त्यावाटे अनेक जंतू पोटात जातात आणि आजाराला निमंत्रण मिळते. संसर्ग पसरण्याचा धोका असतो. बरं या वस्तू रोज संपर्कात येणाऱ्या असल्याने काही वेळेला त्यांना टाळणे शक्य होत नाही पण त्यापासून स्वत:चे आरोग्य नक्कीच जपू शकतो.पण आपल्या आजुबाजूला असलेल्या अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या जंतूंनी भरलेल्या असतात. आणि कळत-नकळत आपला त्यांच्याशी संपर्क येतच असतो.

हँडल, रेलिंग आणि दरवाजाचे नॉब - सार्वजनिक ठिकाणी सर्वात जास्त स्पर्श केल्या जाणाऱ्या वस्तूंपैकी डोअरनॉब, सबवे रेलिंग आणि एस्केलेटर ग्रिप आहेत. दररोज हजारो लोक त्यांना स्पर्श करतात, ज्यामुळे ते बॅक्टेरिया आणि विषाणूंसाठी हॉटस्पॉट बनतात. त्यांना स्पर्श केल्यानंतर आपले हात धुण्यास विसरू नका.

रेस्टॉरंट मेनू कार्ड - तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की एका मेनू कार्डवर १८०,००० प्रकारचे बॅक्टेरिया असू शकतात. दिवसभरात त्यांना अनेक लोक स्पर्श करत असल्याने आणि क्वचितच स्वच्छ केले जात असल्याने ते जंतू नक्कीच आपल्या हाताला लागून त्यातून आजार पसरण्याची शक्यता असते.त्यामुळे जेवण्यापूर्वी हात धुणे अत्यंत महत्वाचे आहे.

डॉक्टरांच्या क्लिनिकमधील वस्तू - डॉक्टर आजारी लोकांना तपासतात आणि तिथे असलेले सर्व काही जसं की, साइन-इन पेन, खुर्चीच्या आर्मरेस्ट आणि दाराचे हँडल हे नक्कीच जंतूंनी भरलेले असते. क्लिनिकमधून परतल्यानंतर हात धुणे सगळ्यात महत्त्वाचे आहे. किंवा दवाखाण्यात जातानाच सोबत हँड सॅनेटायझर घेऊन जाणे योग्य ठरेल.

पाळीव प्राणी - तुमचे पाळीव प्राणी जरी निरोगी दिसत असले तरी, ते त्यांचे फर, लाळ आणि नखांमधून बॅक्टेरिया किंवा परजीवी पसरवू शकतात. त्यांना स्पर्श केल्यानंतर, खायला दिल्यानंतर किंवा स्वच्छ केल्यानंतर तुमचे हात धुणे महत्वाचे आहे.

टचस्क्रीन उपकरणे - मोबाईल फोन, टॅब्लेट किंवा विमानतळावरील कियोस्क स्क्रीन सतत स्पर्श केल्या जातात परंतु क्वचितच स्वच्छ केल्या जातात. संशोधनातून असे दिसून आले आहे की मोबाईल फोनमध्ये टॉयलेट सीटपेक्षा १० पट जास्त बॅक्टेरिया असतात. वापरल्यानंतर तुमचे हात धुवा आणि तुमची उपकरणे नियमितपणे स्वच्छ करा.

स्वयंपाकघरातील स्पंज आणि कटिंग बोर्ड - स्वयंपाकघरातील स्पंज आणि कटिंग बोर्ड हे बॅक्टेरियांसाठी प्रजनन स्थळे आहेत. विशेषतः जेव्हा कच्चे मांस त्यांच्यावर ठेवले जाते आणि कापले जाते तेव्हा ते बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता असते. अशावेळी या वस्तूंना हाताळल्यानंतर हात धुणे तुमच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

इतरांचे पेन - इतरांनी वापरलेल्या पेनमधून बॅक्टेरिया तुमच्या हाताच्या सहजपणे संपर्कात येऊ शकतात. त्यामुळे पेन वापरल्यानंतर हात धुवा किंवा सॅनिटाईझ करा.

साबण डिस्पेंसर - हे ऐकायला विचित्र वाटेल, पण साबणाच्या बाटल्या आणि डिस्पेंसर देखील जंतूंचे स्थान असते. रिफिल करण्यायोग्य साबणाच्या बाटल्यांबाबत विशेषत: काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या पृष्ठभागावर जंतू जमा होऊ शकतात. त्यामुळे या वस्तूही स्वच्छ ठेवणे गरजेचे असते.

ट्रेन किंवा रिक्षाचे हँडल - रोज प्रवास करताना लाखो लोकांचे हात त्या हँडलला लागत असतात. त्यामुळे जंतू आणि आजार दोन्ही गोष्टी आपल्या संपर्कात येऊ शकतात. त्यासाठी हात धुवा किंवा सॅनिटाईज करा. तसेच लोकल ट्रेनमध्ये प्रवास करताना किंवा कोणत्याही वाहनातून प्रवास करताना त्यांच्या खिडक्यांना अजिबात स्पर्श करू नका.

# माजी आमदार शिरिषदादा चौधरी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपस्थिती शिवबंधन बांधले

## आगामी निवडणुकीत नंदुरबार जिल्ह्यात शिवसेना पक्षाची ताकद वाढली

दैनिक वादळ वार्ता
**लाला चव्हाण । वडाळी**

नंदुरबारचे भूमिपुत्र असलेले, अंमळनेर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शिरीष चौधरी यांनी, भाजपला सोडचिठ्ठी देत अखेर शिवसेनेच्या शिंदे गटात, आज आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक,संतोष डांगर
यांच्या हस्ते जाहीर प्रवेश करून, दिग्गज राज्यकर्त्यांना धक्का दिला आहे. नंदुरबार जिल्ह्यात मागील गेल्या कित्येक दिवसापासून शिवसेना शिंदे गटात मोठ्या राजकीय वलय असलेल्या लोकप्रतिनिधीच्या प्रवेशाची चर्चा रंगली होती, शेवटी आज अखेर १४ ऑक्टोंबर २०२५ रोजी नंदुरबारचे भूमिपुत्र असलेले व अंमळनेर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शिरीष चौधरी यांनी, मुंबई येथे शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रमुख राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश करून दिग्गजांना धक्का दिला आहे, यामुळे नंदुरबार जिल्ह्यासह अंमळनेरच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे, एकंदरीतच नंदुरबार जिल्ह्यासह राज्यभरात आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश झाल्याचे बोलले जात आहे, नंदुरबार जिल्ह्यात शिवसेनेच्या शिंदे गटात मोठ्या प्रमाणावर सत्ताधारी पक्षातील विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत, अन्य विरोधी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रवेशाच्या सिलसिला हा सुरू असतानाच, अमळनेर विधानसभा



मतदारसंघाचे माजी आमदार तथा नंदुरबारचे भूमिपुत्र शिरीष चौधरी यांच्या प्रवेशाने नंदुरबार जिल्ह्यासह जळगाव जिल्ह्याच्या राजकारणाला देखील याचा फायदा शिरीष चौधरींच्या प्रवेशामुळे होणार, एवढे मात्र निश्चित झाले आहे, आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या प्रवेशाचा शिवसेनेच्या शिंदे गटाला किती फायदा होणार, हे येणाऱ्या आगामी निवडणुकीतून स्पष्ट होणारच, आज मुंबई येथील शिवसेनेच्या शिंदे गटात माजी आमदार शिरीष चौधरी यांच्यासह, त्यांचे मोठे बंधू हिरा उद्योग समूहाचे चेअरमन प्राध्यापक डॉक्टर रवींद्र चौधरी, तसेच अंमळनेर पालिकेचे सदस्य तसेच नंदुरबार पालिकेचे सदस्य यांच्यासह विविध स्थानिक स्वराज्य संस्थेतील अमळनेर व नंदुरबार येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला आहे, यावेळी शिवसेनेच्या शिंदे गटाचे राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, तसेच आमदार संतोष बांगर, आमदार आमश्या पाडवी, विधानपरिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी, यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# बीड येथील ओबीसी समाजाच्या मेळाव्याला बहुसंख्येने उपस्थित राहावे–मेजर राम राऊत

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचे हक्क, अधिकार व आरक्षण टिकवण्यासाठी एकजुटीची गरज आहे. ओबीसी समाजातील सर्व बांधवांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय अस्तित्वासाठी ठाम भूमिका घ्यावी व आवाज बुलंद करावा, असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्यकर्ते मेजर राम राऊत यांनी केले आहे.या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि ओबीसी समाजाच्यावतीने भव्य ओबीसी समाज एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा ऐतिहासिक मेळावा दि.१७ ऑक्टोबर २०२५ रोजी,शुक्रवार, दुपारी ४ वाजता,छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल,बीड शहर येथे पार पडणार आहे.या



मेळाव्यास छगन भुजबळ राष्ट्रीय अध्यक्ष महात्मा फुले समता परिषद, ओबीसी समाजाचे हृदय सम्राट यांच्यानेतृत्वाखाली तसेच मा.मंत्री धनंजय मुंडे,प्रा.लक्ष्मण हाके यांच्यासह राज्यभरातील कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभणार आहे.केज तालुका व विधानसभा मतदारसंघातील ओबीसी बांधवांनी या मेळाव्यात लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन आपल्या एकतेचे दर्शन घडवावे, असे आवाहन मेजर राम राऊत यांनी केले.

ओबीसी समाजात ३७४ जातींचा समावेश असून या समाजाचे सामाजिक आणि राजकीय आरक्षण सध्या धोक्यात आलेआहे. सरकारने याचे संरक्षण केले पाहिजे,मात्र सध्याची भूमिका ही संदिग्ध आणि चिंताजनक असल्याचे मत राऊत यांनी व्यक्त केले. फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब काही मंडळींकडून केला जात आहे.त्यालाप्रतिकार करण्यासाठी समाजाने एकदिलाने उभे राहणे अत्यावश्यक आहे,असेही त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या हक्कांसाठी आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी प्रत्येक ओबीसी बांधवाने या मेळाव्याचे साक्षीदार व्हावे.एकजूट हीच आपली ताकद आहे,हे सरकार व विरोधकांना दाखवून देण्याची हीच योग्य वेळ आहे, असे ठाम वक्तव्य मेजर राऊत यांनी केले.या मेळाव्याच्या निमित्ताने ओबीसी समाजाचे नेते,कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन समाजाच्या न्यायहक्का साठी एकत्र लढण्याचा संकल्प करणार आहेत. मेळाव्याची तयारी जोरात सुरू असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# माजलगावच्या श्रीहरीची 'हवाई' झेप!

## इंडिगोमध्ये एअरक्राफ्ट इंजिनियर म्हणून आहेर यांचा ठसा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

कोणत्याही क्षेत्रात आज माजलगावकर मागे नाहीत. थेट इंडिगो एअरलाईन्समध्ये एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर म्हणून श्रीहरी गोविंदराव आहेर याने उमटलेला ठसा प्रेरणादायी आहे. दरम्यान, श्रीहरीच्या हवाई झेपेबद्दल कौतुकाचा वर्षाव होत आहे. माजलगाव शहरातील सामान्य कुटुंबातून आलेला श्रीहरी गोविंदराव आहेर या तरूणाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर विमान देखभाल अभियांत्रिकी क्षेत्रात एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर बनून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. श्रीहरीने असोशिएट टेक्निशियन, ज्युनियर टेक्निशियन, टेक्निशियन अशी सर्व पायरी पार करत अखेर एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर पदवी प्राप्त केली आहे. बुधवारी दिल्ली येथे झालेल्या पदवी वितरण समारंभ कार्यक्रमात त्याला ही पदवी मिळवून श्रीहरी आहेर या तरूणाने माजलगावचा अभिमान वाढवला आहे. या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



आपल्या या तेजस्वी प्रवासात त्याला एअरक्राफ्ट क्षेत्रातील प्रतिष्ठित पीयर अवॉर्ड हा सन्मान देखील मिळाला आहे. हा पुरस्कार अत्यंत मेहनती आणि गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला जातो. श्रीहरीने तो आपल्या परिश्रम, शिस्त आणि निष्ठेच्या बळावर मिळवला आहे. श्रीहरीचं बालपण अत्यंत सामान्य परिस्थितीत गेलं. त्याने इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण श्री सिध्देश्वर विद्यालय माजलगाव येथे केले व उर्वरित शिक्षण बंगलोर येथे केले. त्यांचे वडील वारकरी संप्रदायाशी जोडलेले असून त्यांनी भक्ती, प्रामाणिकपणा आणि संयम या संस्कारांनी कुटुंबाची जडण घडण केली. आर्थिक परिस्थिती आव्हानात्मक असतानाही श्रीहरीने हार मानली नाही; उलट प्रत्येक अडचणीला संधी मानून आपला मार्ग स्वतः घडवला.श्रीहरीचे दोन्ही बंधू आपल्या कार्यातून समाजात प्रेरणा निर्माण करत आहेत. एक भाऊ चैतन्य माजलगाव येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत असून, दुसरे भाऊ सच्चिदानंद शिवचरित्र व्याख्याते म्हणून शिवरायांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवतात. श्रीहरीला या दोन्ही बंधूंचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन लाभल्यानेच त्याला यशाचे शिखर गाठता आले. अशा साध्या, धार्मिक आणि संस्कारी कुटुंबात वाढलेल्या श्रीहरीने मिळवलेलं हे यश म्हणजेच संघर्षातून अवकाशाला गवसणी घातली आहे.

# जोगेश्वरी मिसळ ग्रुपच्या वतीने कुंबेफळ येथील गरजू कुटुंबांची दिवाळी गोड,गरजू कुटुंबांना किराणा साहित्य भेट

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

'मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना,दीप लावू अनाथांच्या उशाला रोज राती झोपताना या ओळी सार्थ करत पुणे येथील जोगेश्वरी मिसळ आणि फरसाण ग्रुप उद्योजक सचिन पाटील, नितीन पाटील बंधूनी कुंबेफळ येथील गरजवंत शेतकरी,कामगार,मजूर,अनाथ अशा कुटुंबांना दिवाळी भेट म्हणून किराणा साहित्य वाटप केले. पुणे येथे कार्यरत असलेले महेश थोरात यांच्या समन्वयातून जोगेश्वरी उद्योग समूहाचे दानशूर हात पुढे आले आहेत.सामाजिक बांधिलकी जपत पाच वर्षापासून सातत्य पूर्ण मदत करत आहेत. बीड जिल्ह्यात हजारो कुटुंब यांना त्यांनी मदत केली आहे.कुंबेफळ येथील गरजूंचीदिवाळी



गोड केल्याने कुटुंबांनी आनंद व्यक्त केला. जोगेश्वरी ग्रुपच्या वतीने देण्यात आलेल्या निधीतून बुधवार रोजी किराणा खरेदी करून किट तयार करून पॅकिंग करून प्रति कुटंबास भेट दिले.साखर, हरभरा डाळ,तांदूळ, मकापोहे तूप,शेंगदाणे, तेल,मैदा गरा,मुरमुरे, फरसाण,साबण चिवडा, खोबरं दाळवे,हळद, मसाला,आदी किराणा सामान किट तयार करून देण्यात आली.डॉ.हनुमंत सौदागर यांच्या हस्ते किराणा साहित्य किट देण्यात आल्या.यावेळी सरपंच अविनाश पांचाळ, प्रकाश थोरात,धनराज थोरात,संपती थोरात, दादासाहेब थोरात,संदिप थोरात,नरसिंग थोरात, गोरख थोरात,मोतीराम थोरात,विष्णु थोरात, राजेंद्र थोरात,किरण थोरात आदींनी सहभागी होऊन आपल्यामाणसांची दिवाळी गोड केली. यावेळी डॉ.सौदागर म्हणाले की,सामाजिक सेवेसाठी असे आधाराचे हात पुढे येत आहेत यातून माणुसकी समृद्ध होत जाईल गरजूंच्या चेहऱ्या वरील आनंद अन्नदात्या हातांना बळ देत राहील असे मत व्यक्त केले. विष्णू थोरात म्हणाले गावाकरिता जमेल ती मदत मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही केवळ पोस्टमन आहोत ही सेवेची संधी मिळते यामध्ये आनंद आहे असे मत व्यक्त केले लाभार्थी कुटुंबातील महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.या स्तुत्य उपक्रमाबद्दल लाभार्थी कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी वृद्ध महिलांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले होते.

# राष्ट्रवादी पक्षाने आदेश दिलातर अजित पवार गटाचा ढाण्यावाघ शामराव हुले पारगाव जिल्हा परिषद रणांगणात उतरणार

दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा । प्रतिनिधी**

अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचा ढाण्यावाघ म्हणून ओळखले जाणारे शामराव हुले पारगाव जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. पक्षाने आदेश दिल्यास,जनतेच्या सेवेसाठी व विकासासाठी रणांगणात उतरण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. शामराव हुले हे फक्त राजकारणी नसून, लोकांच्या सुखदुःखात नेहमी धावून जाणारे, गावोगाव परिचित असलेले समाजसेवक आहेत. पूरस्थिती असो वा दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची अडचण असो वा विद्यार्थ्यांचा प्रश्न प्रत्येक वेळी त्यांनी तत्परतेने मदतीचा हात दिला आहे. त्यामुळे पारगाव परिसरातील नागरिकांच्या मनात त्यांच्या नावाचा एक वेगळा ठसा उमटलेला आहे.गेल्या काही वर्षांत त्यांनी राजकारण हे सेवेसाठी असतं, सत्तेसाठी नव्हे हा विचार अंगीकारून जनतेत काम केलं



आहे. सामाजिक,शैक्षणिक आणि शेतकरी वर्गीय समस्यांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या हुले यांचा जनाधार दिवसेंदिवस वाढत आहे.आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक जनतेत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. पक्षाने आदेश दिल्यास, पारगाव गटात शामराव हुले मैदानात उतरतील आणि विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करतील,असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केला जात आहे.जनतेचा विश्वास, सेवाभावाची ओळख आणि विकासाचं ध्येय – या तिन्हींचा संगम म्हणजे शामराव हुले, असा जनतेतून उमटणारा स्वर आहे.

## एवढे गोंधळलेले विरोधक मी कधीच पाहिले नाहीत

# कोणत्या मुद्यावर कुठे जायचे हेच त्यांना माहिती नाही–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता **। सोलापूर (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या भेटीवर निशाणा साधला. एवढे गोंधळलेले विरोधक मी केव्हाच पाहिले नाहीत. कोणत्या मुद्यावर कुठे जावे हे ही या लोकांना माहिती नाही, असे ते विरोधकांची खिल्ली उडवताना म्हणाले. यावेळी त्यांनी सरकारने पाऊस आणल्याची टीका करणाऱ्या काँग्रेस खासदार प्रणिती शिंदेंचाही समाचार घेतला.देवेंद्र फडणवीस सोलापुरात आयोजित एका समारंभात बोलताना म्हणाले, नैसर्गिक आपत्तीच्या वेळीदेखील काही लोक राजकारण करतात. काही लोकांच्या डोक्यात इतका किडा गेला आहे की, सोलापुरातील एका नेतृत्वाने म्हटले की सोलापुरात हा जो पाऊस झाला तो निसर्गाने नाही तर राज्य सरकारने आणला, हा महापूर राज्य सरकारने आणला त्यांना एक फूल द्या, कधी कधी मानसिक पा होतो, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांचे नाव न घेता टोला लगावला आहे.सीएम फडणवीस म्हणाले की, इतके गोंधळलेले विरोधक मी माझ्या जीवनात कधीही बघितलेले नाही. इतके मोठे-मोठे लोकं त्यांना कोणत्या मुद्द्यावर कुणाकडे गेले पाहिजे, कायदा काय आहे ह्या गोष्टी माहिती आहे का नाही हे मला माहिती नाही. पण त्यांना सर्व माहिती असेल आणि केवळ वातावरण निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. आगामी निवडणुकीत आपला पराभव झाला तर त्यासाठी कारण शोधण्याचे काम विरोधकांकडून सुरू आहे.

सीएम फडणवीस म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे काहीच चोकलिंगम यांच्याकडे नाही. यासाठी वेगळा कायदा आहे. त्याचे संपूर्ण काम दिनेश वाघमारे यांच्या नेतृत्वात आहे. त्यावर संपूर्ण कंट्रोल हा वाघमारेंकडे देण्यात आला आहे. काल हे सर्व महाभाग चोकलिंगम यांना भेटले. मग त्यांना कळाले की आपण वाघमारेंना भेटायला हवे होते. मग काही तरी थातूर मातूर सांगितले. हे वाघमारेंना बोलवणार आहेत त्यांना वाघमारेंना बोलावण्याचा अधिकार नाही. वाघमारेंना भेटून काय मागणी करावी हे त्यांना समजले नाही. राज्य निवडणूक आयोग हे राज्यातील सर्व निवडणूक घेत असते. वोटर लिस्टच्या संदर्भात ते आक्षेप घेण्यासाठी वेळ देत असतात. पण कायदा समजून घ्यायचा नाही आणि फेक नरेटीव्ह करण्याचा प्रयत्न करत आहे.सीएम फडणवीस म्हणाले की, मतदार यादीमध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर आमचा संपूर्ण पाठिंबा आहे. आमचा कशाला नकार नाही. काही ठिकाणी बोगस नावे आहेत ही जुनीच आहे. आम्ही त्यावर आक्षेप घेतला आहे. तुम्ही सत्तेत असतानाही तेच होते. मला असे वाटते पराभव स्वीकारावा, जनतेते जावे पुन्हा निवडणूक लढवावी. पण याचा कुणाचा भारतील संविधानावर विश्वास नाही. संविधानाने तयार केलेल्या संस्थांवर विश्वास नाही. केवळ फेक नरेटीव्ह तयार करण्याचे काम करत आहेत. यांच्यामध्ये शरद पवारांना समजते काल त्यांच्या हे लक्षात आले आणि ते आज यांच्यासोबत गेले नाही.

सीएम फडणवीस म्हणाले की, कुणाला कुठेही जाता येईल. कुणी कोणासोबतही गेले तरी महायुतीचे निवडून येणार, ती भक्कम आहे. जनता आमच्या पाठीशी आहे. मग आम्ही विजयी झाल्यावर ते आताचे फोटो दाखवून रडणार आहेत की बघा आम्ही म्हंटलो होतो मतदार याद्यांमध्ये घोळ आहे म्हणून. त्यांना रडण्याची सवय आहे ती काही इतक्या लवकर संपणार नाही.



# अतिवृष्टीग्रस्त १२०० कुटुंबांना सव्वा कोटींची मदत

## अभिमन्यू पवारांचा हातभार हभप गहिनीनाथ महाराज, बी बी ठोंबरे यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप

दैनिक वादळ वार्ता

**औसा । नदीम पटेल**

अतिवृष्टीग्रस्त १२०० कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने क्रीएटीव्ह फाउंडेशन व अभय भुतडा फाउंडेशनच्या माध्यमातून अंदाजे सव्वा कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली. औसा येथील विजय मंगल कार्यालयात (१५) ऑक्टोबर रोजी झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून नॅचरल शुगरचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, तसेच विविध मान्यवर आणि हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.



गहिनीनाथ महाराज म्हणाले, राज्यकत्यानें तत्त्वज्ञानी असणे आवश्यक आहे आणि आमदार अभिमन्यू पवार यांचा तत्त्वज्ञानावर चांगला अभ्यास आहे. ते लोकांशी आपलेपणाने वागत असल्यामुळे जनतेचा ओघ त्यांच्या मागे आहे. अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या कुटुंबांना केवळ आर्थिक मदतच नाही, तर मानसिक आधार देण्याची तळमळ त्यांच्यात आहे. ज्या माणसाला लोकांनी सहकार्य केल्याची जाणीव असते, तो कधीही अपवशी ठरत नाही. ती जाणीव आमदार पवार यांच्यात स्पष्ट दिसते, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे मतदारसंघात विकासकामांना गती मिळाली असून, लोकहिताची कामे प्रामाणिकपणे करणारा आमदार मिळणे हे मतदारांचे भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाने केवळ मदतीचे वितरण झाले नाही, तर एक आशावाद आणि सामाजिक बांधिलकीची जाणीवही निर्माण केली. आमदार अभिमन्यू पवार यांच्या या सामाजिक भान आणि तळमळीच्या पुढाकाराचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले. दुःखितांचे अश्रू पुसण्याचे खरे कार्य आमदार अभिमन्यू पवार यांनी केले आहे. शेतकऱ्यांचा संसार पुन्हा उभा करण्यासाठी त्यांनी केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर त्यांच्या उपजीविकेच्या साधनांचा विचार करून निर्णय घेतले आहेत, १ असे गौरवोद्गार नॅचरल शुगरचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी काढले. औसा येथील विजय मंगल कार्यालयात झालेल्या अतिवृष्टीग्रस्त कुटुंबासाठी त्यांनी या प्रसंगी ११.५१ लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली. बी बी ठोंबरे पुढे म्हणाले, समाजात तत्त्व असतात, पण ती तत्त्व आचरणात आणणं गरजेचं असतं. आमदार पवार यांनी अभय भुतडा यांच्या माध्यमातून ती तत्त्वं लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. इतर आमदारांनीही त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घ्यावा. आमदार अभिमन्यू पवार यांनी कोणताही राजकीय रंग न लावता ही मदत केली आहे. निवडणूक संपल्यानंतर गट तट विसरून सर्वांचा आमदार म्हणून त्यांनी काम केले आहे. मदतीचा पैसा त्याच कामासाठी वापरण्यात यावा, ही त्यांची अपेक्षा आहे, श्रेयही ठोंबरे यांनी आमदार पवारांना दिले. येणाऱ्या दोन वर्षांत किल्लारी कारखाना कर्जमुक्त होऊन राज्यात आदर्श ठरेल. शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस किल्लारीला द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंचावर उपजिल्हाधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, कासारशिरसी अपर तहसीलदार शिवाजी कदम, किल्लारी अपर तहसीलदार सागर मुळीक, संतोष मुक्ता, सुभाष जाधव, क्रेटिव्ह फाउंडेशन चे सचिव सुहास पाचपुते, सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नंदुरबार जि.प.व पं.स.निवडणूक: मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी आता ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमात राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. त्यानुसार, मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २७ ऑक्टोबर २०२५ ऐवजी आता ०४ नोव्हेंबर २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार (ग्रामपंचायत शाखा) यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले असून, जिल्ह्यातील नागरिकांनी व मतदारांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाने सुरुवातीला दिलेल्या आदेशानुसार, विधानसभा मतदार याद्यांवरून तयार केलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून २७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध करायच्या होत्या. तसेच, त्याच दिवशी अनुक्रमांकनिहाय मतदान केंद्रनिहाय यादी जनरेट करून प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण करायची होती.

**प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धी.**
**जुनी तारीख (२७/१०/२०२५)**
**सुधारित तारीख (०४/११/२०२५)**
**मतदान केंद्रनिहाय यादी जनरेट करून प्रसिद्धी**
**जुनी तारीख २७/१०/२०२५**
**नवीन तारीख ०४/११/२०२५.**

परंतु, एकाच दिवशी छापील अंतिम यादी अधिप्रमाणित करणे आणि लगेच केंद्रनिहाय यादी जनरेट करणे जिकिरीचे (अवघड) होत असल्याने, या यादीमध्ये चुका/त्रुटी राहण्याची शक्यता होती. ही शक्यता टाळण्यासाठी आयोगाने दिनांक १०/१०/२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे प्रसिद्धीच्या तारखेत वाढ केली आहे.

उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रमोद भामरे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम केलेली प्रभागनिहाय मतदार यादी आणि त्यानंतर जनरेट केलेली मतदान केंद्रनिहाय यादी या दोन्ही आता ४ नोव्हेंबर २०२५ रोजी नागरिकांसाठी प्रसिद्ध करण्यात येतील.

# पत्रकार बालाजी जगतकर यांना पितृशोक श्रावणराव जगतकर यांचे दु:खद निधन

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथील सुपरिचित व्यक्तिमत्व श्रावणराव नामदेवराव जगतकर वय ७५ यांचे अल्पशा आजाराने दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १, ३० दरम्यान निधन झाले. श्रावणराव जगतकर मितभाषी मनमिळावू स्वभावाचे व पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी समाजकार्यात हिरीरीने सहभाग नोंदवला आहे. विद्युत निर्मिती थर्मल पावर स्टेशन येथे ते नोकरीला लागल्यानंतर त्यांनी आपली समाज सेवा व कार्य चालूच ठेवले होते. त्यानंतर विद्युत वितरण कंपनीत त्यांनी आपली सेवा दिली व त्याच ठिकाणी सेवानिवृत्त झाले. त्यांनी धार्मिक कार्यात सतत पुढाकार घेतला होता. त्यांच्याजाने एक मोठी पोकळी परळी शहरात निर्माण झाली आहे.

त्यांच्या पश्चात दोन मुले पत्रकार बालाजी जगतकर व दुसरा मुलगा राजू जगतकर बुलेट रेल्वे कतार येथे मॅनेजर आहे.एक मुलगी व सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.




# नायगावचा हरीप्रसाद पांडे चमकला 'ज्ञानतीर्थ' युवकमहोत्सवात

## तबला वादनात प्रथम, शास्त्रीय तालवाद्यात द्वितीय

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आयोजित 'ज्ञानतीर्थ युवकमहोत्सव २०२५' नुकताच ग्रामीण तंत्र निकेतन, नांदेड येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेत नायगाव येथील शरदचंद्र महाविद्यालयाचा गुणी विद्यार्थी हरीप्रसाद बाळासाहेब पांडे (मांजरमकर) याने तबला वादनात प्रथम तर शास्त्रीय तालवाद्य प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे आणि तालुक्याचे नाव उज्वल केले.हरीप्रसाद हा प्रसिद्ध तबलावादक आणि ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांचा कनिष्ठ चिरंजीव असून, त्याने तबला वादनाचे प्राथमिक धडे वडील बाळासाहेब पांडे, संगीत शिक्षक नामदेव पांचाळ, शंकर बिरादार आणि संजय देशपांडे यांच्याकडून घेतले. पुढे त्याला तालसम्राट प्रशांत गाजरे (तळवलकर गुरुजींचे पटशिष्य) यांचे सखोल मार्गदर्शन लाभले. ग्रामीण पार्श्वभूमीत वाढूनही हरिप्रसादने आपल्या अभ्यासू वृत्ती, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर 'तबला अलंकार' ही पदवी मिळवली आहे.

गतवर्षी लातूर येथील दयानंद महाविद्यालयात झालेल्या युवक महोत्सवातही त्याने यश संपादन करून आपले संगीत कौशल्य सिद्ध केले होते. हरिप्रसादच्या या उल्लेखनीय यशाबद्दल



संस्थेचे अध्यक्ष खा. रविंद्र पाटील चव्हाण, सचिव केशवराव पाटील चव्हाण, प्राचार्य डॉ. बलभीम वाघमारे, उपप्राचार्य डॉ. श्याम पाटील, तसेच सेवानिवृत्त प्राचार्य हरिबाबू ,सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. या स्पर्धेत प्रा. डॉ. गो. रा. परडे व प्रा. मनिषा पांगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. हरीप्रसादच्या या यशाबद्दल सर्वत्र त्याचे अभिनंदन होत असून, त्याच्याकडून आगामी काळात अजून मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मॉनेट बंद असल्याने नागरिक त्रस्त; समाजसेवक उमरभाई पंजेशा यांची नगरपरिषदेला मागणी–जुने सॉफ्टवेअर सुरू करून ८अ उतारे उपलब्ध करावेत

दैनिक वादळ वार्ता

**औसा । खालेद काझी**

औसा तालुक्यात सध्या मॉनेट प्रणाली बंद असल्यामुळे नागरिकांना मालमत्ता ८अ उतारे आणि जन्मदाखले मिळण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर असताना, उमेदवार आणि नागरिकांना निवडणूक प्रक्रियेसाठी बेबाकी व ८अ उताऱ्यांची अत्यंत गरज भासत आहे. मात्र, प्रणाली बंद असल्याने अनेकांना आवश्यक कागदपत्रे मिळत नाहीत, त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर समाजसेवक उमर भाई पंजेशा यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देत मागणी केली आहे की, नवीन सॉफ्टवेअर सुरू होईपर्यंत नगरपरिषदेमधील कामकाज जुने सॉफ्टवेअर वापरून सुरू ठेवावे आणि नागरिकांना ८अ उतारे तातडीने उपलब्ध करून द्यावेत.त्यांनी प्रशासनाने नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही केली आहे.



# बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी यांच्या वतीने विमा धनादेश प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी शाखा केज शाखेच्या वतीने मयत कर्जदार सभासदाचे वारसास विमा धनादेश वितरण करण्यात आला.सहकाराची समृद्ध परंपरा जतन करण्याबरोबरच सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन ग्राहक लघु उद्योजक व शेतकरी सभासदांच्या हितासाठी आर्थिक व सोशल बँकिंग राबविणारी व आशिया खंडातील प्रथम क्रमांकाची संस्था म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या संस्थेच्या बीड विभागातील शाखा केजच्या वतीने मयत कर्जदाराच्या वारसास विमा धनादेशाचे वितरण करण्यात आले.मु.धर्माळा पोस्ट लव्हूरी तालुका केज येथील रहिवासी व संस्थेचे सभासद गणेश अंकुश सोळुंके यांनी दिनांक २०/०५/२०२४ व दिनांक.११/०६/२०२४ आणि दि.०१/०८/२०२४ रोजी शाखा केज येथून सोनेतारण कर्ज रक्कम रुपये १०९०००/– घेतले होते.दरम्यान त्यांचा दिनांक २५/०९/२०२४ रोजी विजेच्या धक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. संस्थेच्या वतीने ठेविदाराला



ठेवी रकमे एवढे व कर्जदारास कर्ज रकमे एवढे अपघातीविमा संरक्षण देण्यात येते सदर घटनेची माहिती मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री राधेश्यामजी चांडक (भाईजी) संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.सुकेशजी झंवर सर व संस्थेचे सर व्यवस्थापक कैलासजी कासट सर यांच्या आदेशा नुसार तसेच बीड विभागा चे विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक दिपक काळे यांनी सोळुंके परिवाराचे सांत्वन करून मयत सभासदाच्या वारसास लागू असलेल्या अपघाती विमा संबंधी सर्व माहिती दिली.यावेळी सोळुंके परिवाराकडून आवश्यक ती सर्व कागदपत्राची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर करण्यात आला.या योजनेअंतर्गत आयसीआयसीआय लोंबार्ड कंपनीने मयत कर्जदार गणेश अंकुश सोळुंके यांच्या कर्जाच्या व्याजासह पूर्ण रकमेचा ११५०००/– चा क्लेम मंजूर करून आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी मयत खातेदार सभासद यांच्या वारसदार श्रीमती सोनाली गणेश सोळुंके यांना सोनेतारण कर्ज खात्यातील सोने चिज वस्तू श्री.माधव मगर विभागीय व्यवस्थापक बीड यांच्या हस्ते देण्यात आले.यावेळी केज शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. दिपक काळे व धारूर शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री.बप्पासाहेब लांडे व ठेवीदार ग्राहक सभासद उपस्थित होते.

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये मा.राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी

## श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिशस्कूल मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती तथा थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करुन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री. संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे व प्रिन्सीपल सीमा फुटाणे व शिक्षिका आरती आचार्य यांनी डॉ.ए पी जे



अब्दुल कलाम यांच्या जीवन चरीत्रावर व डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांवर गौरवोद्गार काढून मनोगत व्यक्त केले,या कार्यक्रमाला सोनाली खंदारे,कोमल कापरे,रेश्मा गायकवाड, नेहा शेख,प्रीती गाते, साक्षी बर्डे यांच्यासह मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व पालक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरती आचार्य यांनी केले तर आभारप्रदर्शन वैष्णवी काळे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077